महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५/४९२
ई-मेल – intake@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

परिपत्रक / कालमर्यादित:

क्रमांक: १०/एनजीपी/प्रवेशक्षमता/औषधनिर्माणशास्त्र पदविका/२०२४/४५४ दिनांक: 20 SEP 2024

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील बारावीनंतरचे प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी संस्थेतील अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत**

संदर्भ : १. संचालनालयाचे परिपत्रक क्र.१०/एडीएम/Intake Approval/२०२४/२०९, दि.२२/०५/२०२४
२. संचालनालयाचे वेळापत्रक क्रमांक: तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/२०२४/बारावी नंतरचे प्रथम वर्ष पदविका/औषधनिर्माणशास्त्र/४१६, दिनांक: ०६/०९/२०२४
३. फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचे परिपत्रक क्र. Ref No. 14-56/2022-PCI (Approval Process for 2024-2025) Dated-15.09.2024

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील बारावीनंतरचे प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सहभागी असणा-या संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अचूक व अद्ययावत असणे आवश्यक आहे. संस्थाबाबतची औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली या शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठ यांचेकडून संलग्नता / समकक्षता प्रदान केल्याची माहिती तसेच त्यासोबतची संस्थेची सांख्यिकीय माहिती तंत्र शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या https://approval24.dtemaharashtra.gov.in या लिंकवर अद्ययावत करून दि. २१ जून २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत संदर्भ क्र.१ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते. मात्र दरम्यानच्या काळात शिखर परिषदेची मान्यतेअभावी बऱ्याच संस्थांनी माहिती अद्ययावत केले नसल्याचे निदर्शनास आले होते.

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या संदर्भ क्र.३ च्या परिपत्रकान्वये, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिताची मान्यता प्रक्रिया अंतिम टप्यात असल्याचे नमुद केले आहे. तसेच त्यांनी जवळपास सर्व विद्यमान संस्थांची मान्यतेची कार्यवाही पुर्ण केल्याचे देखील नमुद केले आहे. त्याचबरोबर सर्व प्रवेश नियामक प्राधिकरणांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी मान्यता दिलेल्या संस्थांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू करण्याची विनंती केलेली आहे. तंत्रशिक्षण संचालनालयाद्वारे प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी अंतिम गुणवत्ता यादी पर्यंतचे वेळापत्रक संदर्भ २ अन्वये प्रसिद्ध केले आहे. तसेच कॅपच्या विविध फेरींकरिता विकल्प अर्ज (ऑप्शन फॉर्म) भरणे, कॅप जागावाटप, जागास्वीकृती करणे, उमेदवाराने वाटप केलेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहणे, प्रवेशाची अंतिम तारीख इत्यादींबाबतचे पुढील वेळापत्रक संचालनालयाद्वारे लवकरच प्रसिद्ध करण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम राबविणा-या सर्व संस्थांच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली या शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई संलग्नता/समकक्षता प्रदान केल्याची माहिती व प्रवेशक्षमता अद्ययावत करुन **दिनांक ०३.१०.२०२४ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत** ऑनलाईन पध्दतीने सादर करावी. तसेच संस्थांनी सादर केलेली माहिती संबंधित तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयाद्वारे पडताळणी व प्रमाणित करुन घ्यावी. **तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयाद्वारे दिनांक ०३.१०.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** अद्ययावत करण्याची कार्यवाही पुर्ण करावी.

ज्या संस्था प्रवेशक्षमतेबाबतची माहिती अद्ययावत करणार नाहीत तसेच संबंधित तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयाद्वारे प्रमाणित करुन घेणार नाहीत, अशा संस्थांचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत करण्यात येणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेची राहील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

( डॉ. विनोद मोहितकर )
संचालक,
तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, नागपूर, नाशिक व पुणे - त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपण आपल्या स्तरावरुन आपल्या अधिनस्त सर्व पदविका संस्थांच्या निदर्शनास

आणून द्यावे. पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांनी सादर केलेली माहिती पडताळणी करुन व अचूक माहिती प्रमाणित करुन संकेतस्थळावर <u>**दिनांक ०३.१०.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत**</u> अद्ययावत करावी व त्याबाबतचा अंतिम अहवाल संचालनालयास सादर करावा.

२) का. क्र. ३, मुख्य कार्यालय, मुंबई - यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

३) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ - यांना संलग्नता/समकक्षता प्रदान करण्याच्या अनुषंगाने उचीत कार्यवाहीस्तव.

*******